# ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प संवर्धन प्रतिष्ठान

वार्षिक अहवाल
आर्थिक वर्ष २०२२-२३





**संकल्पना :**

डॉ. जितेंद्र रामगावकर (IFS)
कार्यकारी संचालक,
ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प संवर्धन प्रतिष्ठान, चंद्रपूर

**मार्गदर्शक :**

श्री. नंदकिशोर काळे (IFS)
सदस्य, ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प संवर्धन प्रतिष्ठान, चंद्रपूर

श्री. कुशाग्र पाठक (IFS)
सदस्य, ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प संवर्धन प्रतिष्ठान, चंद्रपूर

श्री. महेश खोरे (ACF)
सदस्य सचिव, ताडोबा-अंधारी व्याघ्र संवर्धन प्रकल्प प्रतिष्ठान, चंद्रपूर

**लेखन :**

प्रफुल्ल सावरकर
पर्यावरण शिक्षणाधिकारी
ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प संवर्धन प्रतिष्ठान, चंद्रपूर

**संकलन छायाचित्र :**

टीम : ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प.

**सहकार्य :**

प्राजक्ता हुशंगाबादकर
शहेबाज शेख
अखिल राईंचवार
अवीनाश कुंभरे
विशाखा दिनकर

**मुखपृष्ठ**

श्री. महेश खोरे (ACF TATR)

**संकलन मांडणी:**


श्रेया खाडिलकर

ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प संवर्धन प्रतिष्ठान, चंद्रपूर २०२३ यांच्याकडे प्रकाशनाचे सर्व हक्क राखीव आहेत. या अहवालाची कोणतीही माहिती, छायाचित्र हे इलेक्ट्रॉनिक व तांत्रि-करीत्या कार्यकारी संचालक, ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प संवर्धन प्रतिष्ठान,चंद्रपूर यांच्या लेखी परवानगी शिवाय प्रकशित किंवा प्रसारीत करता येणार नाही.

सर्व हक्क राखीव ©

# ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाचे २ प्रशासकीय विभाग

| विभाग | क्षेत्रफळ | वन परिक्षेत्र |
|---|---|---|
| कोअर | ६२२.८७.चौ.किमी. | ०५ |
| बफर | ११०७.०० चौ किमी | ०६ |



## मनोगत :

डॉ. जितेंद्र रामगावकर (IFS)
कार्यकारी संचालक,
ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प संवर्धन प्रतिष्ठान, चंद्रपूर



## अनुक्रमणिका

- सारांश
१. ओळख..........१
२. वर्ष २०२२-२३ मधील ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प संवर्धन प्रतिष्ठानची आर्थिक माहिती..........३
३. सामाजिक दायित्व निधी..........४
४. संवर्धन व संरक्षण..........९
५. अधिवास व्यवस्थापन..........११
६. संशोधन..........१४
७. निसर्ग पर्यटन व रोजगार निर्मिती..........१६
८. कौशल्य विकास उपक्रम..........१८
९. जनजागृती व निसर्ग शिक्षण..........२१
१०. मानव-प्राणी संघर्ष व उपाय-योजना..........२७
११. ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प वर्धापन दिवस..........३०
११.१ ग्राम परिस्थितीकिय विकास समितींना निधी वितरण
११.२ उत्कृष्ट ग्राम परिस्थितीकिय विकास समिती
११.३ उत्कृष्ट प्राथमिक कृती दल पुरस्कार
११.४ शालेय विद्यार्थ्यांचा सत्कार व बक्षीस वितरण
११.४ उत्कृष्ट निसर्ग मार्गदर्शक पुरस्कार
११.५ उत्कृष्ट होम स्टे व रिसोर्ट पुरस्कार
११.६ सामाजिक दायित्व पुरस्कार
१२. वन अधिकारी व कर्मचारी क्षमता-विकास..........४३
१३. वने व वन्यजीव विषयक दिवस..........४५
१४. इतर महत्वपूर्ण उपक्रम..........४६
१५. प्रशासकीय कर्मचारी..........५१



ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प संवर्धन प्रतिष्ठान, चंद्रपूर यांच्यामार्फत वर्ष २०२२ ते २०२३ या कालावधीत विविध स्वरूपातील उपक्रम राबविण्यात आलेत आणि या सर्व उपक्रमांचा प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष फायदा वने व वन्यजीव सुरक्षित व अबाधित राहण्यासाठी झाला. याशिवाय या उपक्रमांच्या माध्यमातून बफर क्षेत्रातील स्थानिकांवरती सुद्धा सकारात्मक परिणाम दिसत आहे. वर्ष २०२२ ते २०२३ या आर्थिक वर्षातील महत्वाचा उद्देश असा होता कि "वाघाच्या अधिवासासोबत स्थानिकांच्या उन्नत विकासाकरिता व्याघ्र प्रतिष्ठानच्या माध्यमातून सर्व स्थरावर स्थानिक समुदायाचा आनंददायी तसेच आर्थिक व सामाजिक विकास करण्यात यावा आणि लोक-सहभागातून वने व वन्यजीवांचे संवर्धन व संरक्षण व्हावे आणि याच महत्वपूर्ण हेतूने प्रेरित होऊन या वर्षी विविध योजना आखण्यात आल्यात आणि त्याला पूर्णत्वास नेण्यासाठी सर्वतोपरी कार्य करण्यात आले. वर्ष २०२२ ते वर्ष २०२३ या कालावधीत शाश्वत निसर्ग पर्यटनाच्या माध्यमातून रुपये १२,६३,७३,९६१/- प्राप्त झाले होते.यापैकी रुपये १०,१५,५६/- ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प संवर्धन प्रतिष्ठानच्या वार्षिक आर्थिक संकल्पामध्ये व्याघ्र संवर्धन प्रतिष्ठान समितीमार्फत मान्यता देण्यात आली आणि विविध स्वरूपातील महत्वपूर्ण उपक्रम राबविण्यात आले. यामध्ये संरक्षण व संवर्धन, कौशल्य विकास प्रशिक्षण, संशोधन, वर्धापन दिन, ग्राम-परिस्थितीकिय विकास समितींना निधी वितरण, विविध पुरस्कार वितरण, जन-जागृती व निसर्ग शिक्षण, निसर्ग पर्यटन व रोजगार निर्मिती, मानव-प्राणी संघर्ष टाळण्यासाठी विविध महत्वपूर्ण उपक्रम, क्षमता-विकास, अधिवास व्यवस्थापन, शालेय विद्यार्थ्यांचा गुण-गौरव, वने व वन्यजीव दिवस, प्रकाशन व माहिती पट, घनकचरा व्यवस्थापन, प्लास्टिक मुक्त ताडोबा अशा वैविध्यपूर्ण उपक्रमांच्या माध्यमातून वने व वन्यजीवांचा अधिवास सुरक्षित व अबाधित राखण्यात आला व स्थानिक समुदायाच्या उन्नत विकास सुद्धा साधण्यात आला.

या ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प संवर्धन प्रतिष्ठानच्या माध्यमातून सामाजिक दायित्व निधी सुद्धा उभारण्यात आला आणि या आर्थिक वर्षात विविध सामाजिक दायित्व जपणाऱ्या संस्थानांनी सुद्धा या व्याघ्र प्रकल्पाला निधी व महत्वपूर्ण साहित्याच्या माध्यमातून सहकार्य करून पाठबळ दिले आहे. एकूण रुपये ७६५८८४५३/- निधी प्राप्त झाला आहे आणि हा निधी सुद्धा वने वन्यजीव संवर्धन व संरक्षण आणि विशेषत: स्थानिक समुदायाच्या उन्नत विकासात्मक उपक्रमांसाठी राबविण्यात आलेला आहे. तसेच इतर संस्थानांनी सुद्धा स्थानिक गावांमध्ये विविध महत्वपूर्ण उपक्रम राबवून सहकार्य केले आहे.

वर्ष २०२२-२०२३ या आर्थिक वर्षात विशेष तरतूद करण्यात आलेली होती, यामध्ये विशेषत: ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या२८व्या वर्धापन दिनानिमित्य बफर क्षेत्रामध्ये असलेल्या डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी जन-वन-योजना अंतर्गत कार्यन्वित असलेल्या सर्व ९५ ग्राम-परिस्थितीकिय विकास समितींना निसर्ग पर्यटनाच्या माध्यमातून एकूण प्राप्त झालेल्या निधीतील व व्याघ्र प्रतिष्ठानच्या आर्थिक संकल्पातील १/४ रक्कम गावातील मुलभूत सुविधा पूर्ण करण्यासाठी मंजूर करण्यात आले होते आणि याच हेतूने प्रती ग्रामपरिस्थितीकिय विकास समितींना रुपये ३.५० लक्ष. मा. सुधीर मूनगंटीवार, मंत्री, वने, मत्स्य व्यवसाय व सांस्कृतिक संचनालाय, महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. तसेच उत्कृष्ट कार्य करण्याऱ्या पाच ग्राम ग्रामपरिस्थितीकिय विकास समितींना सुद्धा पुरस्कार प्रदान करण्यात आले. या व्याघ्र प्रकल्प क्षेत्रातील वना लगतच्या शिष्यवृत्ती प्राप्त शालेय विद्यार्थिंना सायकल भेट देण्यात आली. वर्ग १० व १२ वर्गातील गुणवंत विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी उपयुक्त असलेले टॅबलेट व लॅपटाप देऊन गौरविण्यात आले आहे. मानव-प्राणी संघर्ष टाळण्यासाठी कार्यरत एकूण ४० प्राथमिक कृती दलापैकी पाच कृती दलांना उत्कृष्ट सेवा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले, उत्कृष्ट निसर्ग मार्गदर्शक पुरस्कार, पर्यावरण-पूरक होम-स्टे व रिसोर्ट यांना ग्रीन पुरस्कार, सामाजिक दायित्व जपणाऱ्या संस्थानां सामाजिक दायित्व पुरस्कार प्रदान करण्यात आलेत.

वर्ष २०२२-२०२३ या वर्षातील लोक सहभागातून या समृद्ध व संपन्न वनाचे संवर्धन आणि संरक्षण करण्यात करण्यात आले आहे. यामध्ये शालेय विद्यार्थी, शिक्षक, स्थानिक महिला, युवक, गावकरी, निसर्ग मार्गदर्शक, गुराखी, वन अधिकारी, कर्मचारी, संशोधक, सामाजिक दायित्व जपणाऱ्या संस्था व इतर सामाजिक संस्था यांच्या सहभागातून या असीम वनाचे जतन करण्यात आले आहे.




Ajay Thakur


निसर्ग शिक्षणातून वने व वन्यजीव संवर्धन व संरक्षण

## १. ओळख

**ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प हे भारतातील प्रसिद्ध व्याघ्र प्रकल्पापैकी एक आहे.** हे वन ज्या पद्धतीने घडत गेले व घडविण्यात आले ते अत्यंत महत्वाचे आहे १८७३ पासून या वनामध्ये संरक्षण व संवर्धन संदर्भातील उपाययोजना आखण्याची सुरवात झाली. १८७९ ला ताडोबा हे प्रादेशिक वन क्षेत्र म्हणून घोषित केले. १९०५ ला वाघाच्या शिकारीवर बंधने घालण्यात आली. १९३५-४५ ला ताडोबा तलावा परिसरातील ४५ किमी. वनक्षेत्राला अभयारण्याचा दर्जा देण्यात आला आणि येथून पुढे वर्ष १९५५ ला ११६.५५ चौ.किमी.क्षेत्राला राष्ट्रीय उद्यानाचा दर्जा देण्यात आला. १९८६ ला या वनातून उगम पावणाऱ्या अंधारी नदीवरून ५०६.३२ चौ.किमी.ला अंधारी अभयारण्य म्हणून घोषित करण्यात आले, वर्ष २३ फेब्रुवारी १९५५ ला या वनाला सर्वोत्तम व्याघ्र प्रकल्पाचा दर्जा देऊन गौरविण्यात आले आणि ६२५.४० चौ.किमी.क्षेत्र हे वाघाच्या संवर्धन व संरक्षणाकरिता अबाधित व सुरक्षित करण्यात आले. हे व्याघ्र प्रकल्प भारतातील २० वे व्याघ्र प्रकल्प म्हणून उदयास आले. देश-विदेशातून पर्यटकांचा ओघ या संरक्षित क्षेत्राकडे वाढू लागला. उच्च दर्जाचे संरक्षण व संवर्धनात्मक उपायोजना यामुळे वाघाची संख्या वाढायला लागली आणि वाघ या वनातून इतर वन क्षेत्रात भ्रमण करायला लागले आणि या जाणीव मुळे २०१०-११ ला संरक्षित क्षेत्राच्या २ किलोमीटर क्षेत्राला सुद्धा बफर क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आले आणि ११०७.०० चौ.किमी क्षेत्राला संरक्षणाचा दर्जा प्राप्त झाला आणि वाघाचे भ्रमण सुरक्षित राखण्यात आले. सन २००९-१० मध्ये महाराष्ट्र शासनाच्या अधीसुचनेनुसार ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प संवर्धन प्रतिष्ठानची निर्मिती करण्यात आली आणि **वने व वन्यजीव संवर्धन व संरक्षण संदर्भातील कार्य आणि उपायोजना यांना गती मिळावी, लोकसंहभागातून संवर्धन व्हावे हा महत्वाचा हेतू व उद्देश**. ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प संवर्धन प्रतिष्ठान हे धर्मदाय आयुक्त, चंद्रपूर यांच्यामार्फत नोंदणीकृत असून नोंदणी अधिनियम कायदा १८६० नुसार प्रमाणित आहे तर वनसंरक्षक तथा क्षेत्रसंचालक कार्यालय, ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर यांच्या अंतर्गत या प्रतिष्ठानचे कार्य व उपक्रम राबविण्यात येतात. ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प संवर्धन प्रतिष्ठानची समिति निर्मित केली असून वनसंरक्षक तथा क्षेत्रसंचालक, ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर हे कार्यकारी संचालक असून या प्रतिष्ठानचे संपूर्ण कार्य त्यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येते तर विभागीय वन अधिकारी हे सदस्य सचिव म्हणून काम पाहतात व यामध्ये उपसंचालक (कोअर), उपसंचालक (बफर) व इतर स्थानिक पातळीवरील सदस्य असतात. या संस्थेमार्फत विविध स्वरूपांचे उपक्रम व कार्यक्रम विविध स्तरावर राबविण्यात येत असतात. यामध्ये संरक्षण व संवर्धन, अधिवास व्यवस्थापन, स्थानिक समुदायाच्या उन्नत विकासाकरिता उपजीविका व कौशल्य विकास उपक्रम, जनजागृती संदर्भातील उपक्रम तसेच निसर्ग-पर्यटन, संशोधन, मानव-प्राणी संघर्ष टाळण्यासाठीच्या उपाययोजना, क्षमता-विकास व बांधणी इत्यादी सर्व वने व वन्यजीव संवर्धन याकरिता तसेच वनावर अवलंबवून असणाऱ्या स्थानिक समुदायाचा समतोल विकास व्हावा आणि निसर्ग संवर्धनामध्ये स्थानिकांचा सहभाग निरंतर वाढत राहावा याकरिता ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प संवर्धन प्रतिष्ठान कार्यन्वित आहे. **या प्रतिष्ठानमार्फत राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांच्या माध्यमातून प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या वाघाची वाढती संख्या खालील आलेखातून जाणीवपूर्वक दिसून येते"**

२०२३ च्या व्याघ्र गणनेनुसार ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प क्षेत्रात ८७ वाघाची संख्या नमूद केली आहे.






वन्यजीव अधिवासाकरिता कुरणविकास व्यवस्थापन



स्थानिक कौशल्य विकास उपक्रम, वन्यजीवन कौशल्य विकास केंद, पांगडी ICICI Foundation for Inclusive Growth यांच्या सहकार्या ने.

**आखिल भारतीय व्याघ्र अहवाल – भारतीय वन्यजीव संस्थान,देहरादून**

(वर्ष २०१० ते २०२२)




## २. वर्ष २०२२-२३ मधील ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प संवर्धन प्रतिष्ठानची आर्थिक माहिती

ताडोबा-अंधारी व्याघ्र संवर्धन प्रतिष्ठानाला क्षेत्रात राबविण्यात येत असलेल्या निसर्ग पर्यटनाच्या माध्यमातून आर्थिक निधी प्राप्त होत असतो. या व्यतिरिक्त **सामाजिक दायित्व जाणीव** असलेल्या विविध कॉर्पोरेट संस्था, अशासकिय संस्था, व्यक्तिगत पातळीवर निधी प्राप्त झाला आहे किंवा या संस्था आवश्यक साहित्य तसेच इतर माध्यमातून सहकार्य करत असतात.

### २.१ निसर्ग पर्यटन निधी

ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प हे निसर्ग पर्यटनासाठी प्रसिद्ध आहे. देशा अंतर्गत तसेच विदेशातील पर्यटक मोठ्या प्रमाणात या वनाचा व वन्यजीवांचा निस्सीम आनंद घेण्याकरिता येथे येतात आणि या निसर्ग पर्यटनाच्या माध्यमातून ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प संवर्धन प्रतिष्ठानला आर्थिक निधी प्राप्त होतो. या निधीच्या माध्यमातून अनेक विकासात्मक कार्यक्रम राबविण्यात येतात. **निसर्ग पर्यटनाच्या माध्यमातून ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाला वर्ष २०१८-१९ ते २०२२-२३ या कालावधीत एकूण ६१२,८९२, ९६९ रुपये प्राप्त झाले आहेत.**










## ३. सामाजिक दायित्त्व संस्थांमार्फत प्राप्त झालेल्या निधी कार्य

ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प संवर्धन प्रतिष्ठानाला सामाजिक दायित्त्व जपणाऱ्या संस्थामार्फत **वर्ष २०२०-२१, २०२१-२२ ते २०२२-२३ मध्ये एकूण रु.२,४६,७८,३४१/-निधी प्राप्त झाला आहे** आणि हा सर्व निधी संरक्षण, संवर्धन, अधिवास व्यवस्थापन, स्थानिक समुदायाकरिता पर्यायी रोजगार निर्मिती, गाव पातळीवर मुलभूत सुविधा, क्षेत्रीय वन कर्मचारी यांच्याकरिता क्षमताविकास, संरक्षण वाहन, इत्यादी करिता मिळालेला आहे. हा निधी या व्याघ्र प्रकल्पाच्या उन्नत विकासासाठी उपयोगामध्ये येत असून प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरित्या व्याघ्र संवर्धन व वाढीस महत्वपूर्ण ठरत आहे.

| **वर्ष** | २०२०-२०२१ | २०२१-२०२२ | २०२२ -२०२३ | **एकूण सामजिक दायित्व निधी** |
|---|---|---|---|---|
| **निधी (लाखात)** | रु. ३१४३८८८/- | रु. १३८७६०००/- | रु. ७६५८४५३/- | **रु. २४६७८३४१/-** |


निसर्ग शिक्षणातून वन संवर्धन






# सामाजिक दायित्व निधी
# वर्ष २०२०-२१

| अक्र | संस्था | निधी | कार्य |
|---|---|---|---|
| 1 | Smruti Trust, Mumbai | 750000/- | संरक्षण व संवर्धनात्मक उपाययोजनांकरिता |
| 2 | Wildlife Conservation Trust, Mumbai | 500000/- | क्षेत्रीय वन कर्मचारी यांच्याकरिता गणवेश व गस्ती रस्ते दुरूस्तीकरण |
| 3 | Hemendra Kothari Foundation, Mumbai | 500000/- | क्षेत्रीय वन कर्मचारी यांच्याकरिता कल्याण निधी तसेच संरक्षण व संवर्धनासाठी |
| 4 | Smt. Prafullata Dilip Chaware, Mumbai | 500000/- | निसर्ग मार्गदर्शक व जिप्सी चालक यांच्याकरिता आवश्यक साहित्य |
| 5 | Tiger Research & Conservation Trust, Nagpur | 202500/- | प्राथमिक कृती दलाच्या गणवेशाकरिता |
| 6 | Donations from the tourists | 668888/- | कोविड १९ च्या वेळेस निसर्ग मार्गदर्शक, जिप्सी चालक तसेच क्षेत्रीय वन कर्मचारी यांच्या महत्वपूर्ण गोष्टीकरीता निधी. |
| | **Total :** | **3143888/-** | |





# सामाजिक दायित्व निधी
# वर्ष २०२१-२२

| अक्र | संस्था | निधी | कार्य |
|---|---|---|---|
| 1 | ICICI Foundation | 1510000/- | गवतीकुरण, अधिवास विकास व्यवस्थापन |
| 2 | ICICI Foundation | 4670000/- | संरक्षण व संवर्धनात्मक कार्य करिता ५ बोलेरो कॅम्पर वाहन व प्रशिक्षण इत्यादीकरिता |
| 3 | Managing Trust FDCM CSR Trust, Nagpur | 4000000/- | संरक्षण व संवर्धनात्मक व पर्यावरण शिक्षणाकरिता १ बोलेरो कॅम्पर, १ बोलेरो जीप आणि १ मिनीबस |
| 4 | TATA project Ltd. Mumbai | 1540000/- | निसर्ग पर्यटन गेटवरती वॉटर फिल्टर मशीन |
| 5 | Regional Manager State Bank of India | 1000000/- | सर्व पर्यटन गेटवरती CCTV कॅमेरे लावण्याकरिता |
| 6 | Tiger Research Conservation Trust, Nagpur | 525000/- | प्राथमिक कृती दल, क्षेत्रीय वनकर्मचारी गणवेश,बूट |
| 7 | Hemendra Kothari Foundation, Mumbai | 500000/- | क्षेत्रीय वन कर्मचारी क्षमता विकास व कल्याण निधी |
| 8 | ICERTIS Solution Pvt. Ltd | 100000/- | संरक्षण व संवर्धन वाहन खरेदी करण्यासाठी सहकार्य |
| 9 | Shri. Milind Watave, Pune | 21000/- | स्थानिक शेतकरी यांना सहकार्य करण्यासाठी |
| 10 | Smt.Prafullata Dilip Chavare | 10000/- | संरक्षण कुटी दुरुस्ती करण्याकरिता |
| | **Total :** | **13876000/-** | |



# सामाजिक दायित्व निधी
# एप्रिल २०२२ ते मार्च २०२३

| संस्था | प्राप्त निधी (लाखात) | कार्य |
|---|---|---|
| Wildlife Conservation Trust, (WCT), Mumbai | 600000/- | वन्यजीव संदर्भातील गुन्ह्यांच्या केसेसकरिता |
| Mundra International Container Terminal | 2360000/- | 2 थर्मल ड्रोन घेण्यासाठी व क्षेत्रीय वन कर्मचारी यांना ड्रोन हाताळणी संदर्भात प्रशिक्षण देण्यासाठी |
| Hemendra Kothari Foundation, Mumbai | 250000/- | क्षेत्रीय वन कर्मचारी यांच्याकरिता कल्याण निधी आणि संरक्षण व संवर्धन उपायोजना करिता |
| ICERTIS Solution Pvt. Ltd. | 879560/- | वन्यजीव संरक्षण, संवर्धनाकरिता बोलेरो कॅम्पर |
| Mahindra Holidays & Resort India Ltd | 200000/- | 2 संरक्षण कुटीवर सोलर पावर संचय लावण्याकरिता |
| HDFC Capital Advisor Ltd | 518000/- | स्थानिक लोकांसाठी ई-श्रम कार्ड वाटप |
| Nhava-Sheva (India)Gateway | 1800000/- | २ महिंद्रा बोलेरो घेण्यासाठी |
| MITCON Consultancy & Eng. Services Ltd. | 600000/- | कोळसा परिक्षेत्रात पानघटकुटी बांधकाम, दुरूस्ती |
| Defries Bajpai Foundation | 346892/- | वन्यजीव संशोधन व संवर्धनासाठी |
| Donations through online payment | 54000/- | वन्यजीव संवर्धन व विकास निधी |
| **एकूण सामाजकि दायत्वि नधी :** | **7658453/-** | |







# सामाजिक दायित्व विकास निधी

खाली दर्शविण्यात आलेल्या विविध उपक्रमाकरिता सामाजिक दायित्व निधीचा सुयोग्य वापर करण्यात येतो.


संरक्षण व संवर्धन


अधिवास व्यवस्थापन


कौशल्य विकास उपक्रम


मुलभूत सुविधा


निसर्ग पर्यटन



संरक्षण वाहन


वन अधिकारी व क्षेत्रीय कर्मचारी क्षमता विकास कार्यशाळा

## ४. संवर्धन व संरक्षण

**ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प संवर्धन प्रतिष्ठानमार्फत ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या संरक्षण व संवर्धनासाठी महत्वाची भूमिका बजावते.**

**“वने व वन्यजीवांचे संरक्षण व संवर्धन करणे ही प्रथम वन विभागाची प्राथीमिकता आहे आणि याकरिता विविध स्वरूपाचे कार्य या प्रतिष्ठानामार्फत राबविण्याकरिता मोलाचे सहकार्य करते”**



डॉग स्कॉट

१. वन्यजीवांकरिता नैसर्गिक पाणवठ्यांचे खोलीकरण करणे व पाण्याचे स्त्रोत पुनर्जीवित करणे

२. सोलर यंत्रणावर आधारित स्वयंचलीत कुत्रिम पाणवठे व दुरूस्ती व देखभाल करणे

५.क्षेत्रीय वन कर्मचारी यांना संरक्षणासाठी साहित्य पुरवणे

४.वन-वणवा लागू नये या करिता जाळरेषांचे व्यवस्थापन करणे व फायर ब्लोवअर यंत्र व्यवस्थापन

३. गस्ती करण्याकरिता रस्ते व्यवस्थापन

६. संरक्षण कुटी व तपासणी नाके देखभाल व व्यवस्थापन

७. संरक्षण कुटीवर आवश्यक साहित्य

८. बिनतारी संदेश यंत्रणा व्यवस्थापन

९. वन जमिनीवरील अतिक्रमण निर्मुलन

१०.संरक्षण वाहनाचे व्यवस्थापन व देखभाल

सोलर यंत्रणेवर आधारित स्वयंचलीत पाणवठा







गस्ती-रस्ते व्यवस्थापन



जाळरेषा व्यवस्थापन



संरक्षण व बिनतारी संदेश यंत्रणा



वन जमिनीवरील अतिक्रमण निर्मुलन



वन्य प्राण्यांसाठी पाण्याचे व्यवस्थापन

## ५. अधिवास व्यवस्थापन

वन्य जीवांसाठी आवश्यक व हवा तसा अधिवास निर्माण करणे सुद्धा वन विभागाच्या प्राथीमीकतेचा महत्वपूर्ण भाग आहे आहे, यामध्ये स्थानिक गवती प्रजातीचे गवती कुरण विकसित करणे, पाण्याची उपलब्धता वाढविणे, कुत्रिम पाणवठे निर्मित करून त्यांना नैसर्गिक स्वरूप देणे, जेणेकरून वन्यजीवांसाठी ते हवे-हवेसे राहील. आणि याचं अनुषंगाने ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प संवर्धन प्रतिष्ठान विविध प्रकल्प व उपक्रमाच्या अंतर्गत अधिवास व्यवस्थापन करते. कोर क्षेत्रातून पुनर्वसित झालेल्या पळसगाव, कोळसा, जामणी, नवेगाव, बोटेझरी या पुनर्वसित गावातील खाली झालेल्या जागेवर उत्तम प्रतीचा अधिवास निर्माण करण्यात आला आहे.याशिवाय इतर ही आवश्यक ठिकाणी गरजेनुसार अधिवास व्यवस्थापन केले आहे आणि यामध्ये आयसीआय प्रतिष्ठानमार्फत सामाजिक दायित्व निधी सुद्धा प्राप्त झाला आहे.





## वन्यजीव संवर्धन व संरक्षणातील अत्यंत महत्वाचे कार्य अधिवास व्यवस्थापन.

१. तृणभक्षी वन्यप्राण्यांना लागणारा उत्तम अधिवास गवतीकुरण असते. यामध्ये त्यांना मुबलक खाद्य, सुरक्षितता, प्रजननक्षमता व संख्या वाढण्याकरिता गवतीकुरण अधिवास महत्वाचा ठरतो.

२. तृणभक्षी प्राण्यांच्या संख्येवर वाघांची संख्या अवलबवून असते.

३. २०२३ च्या भारतीय वन्यजीव संस्थान, देहरादून व ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प यांच्या शास्त्रशुद्ध अभ्यासानुसार २०२३ मध्ये ८७ वाघ या व्याघ्र प्रकल्पामध्ये सुरक्षित आहेत.

४. कोअर, बफर क्षेत्रात अखाद्य वनस्पतींचे समूळ उच्चाटन करून त्या जागी स्थानिक गवतांच्या प्रजातींच्या बियाणांचे रोपण करून गवतीकुरण उत्तमरित्या विकसित करण्यात येत आहे.

५. कोअर क्षेत्रातील ५ गावांचे स्थानिकांच्या स्वयं इच्छेने उत्तम पुनर्वसन करण्यात आले आहे आणि त्यांच्या खाली झालेल्या जागेवर गवतीकुरण विकसित करून वन्यजीवांचा अधिवास जपण्यात आला आहे. यामध्ये कोळसा, जामणी, बोटेझरी, नवेगाव, पळसगाव या गावांचा समावेश आहे तर रानतळोधी गावाची पुनर्वसन प्रक्रिया शेवटच्या टप्प्यात आहे आणि या जागेवर सुद्धा गवतीकुरण विकसित करण्यात येणार आहे.


६. अखाद्य वनस्पतीच्या निर्मुलनामध्ये रानतुळस, रायमुनिया, तरोटा, कोबडा, रेशीम काटा, जंगली पुदिना, भूतगांजा, गाजर गवत, बाला, गोखरू, चिकना, रानभेंडी इत्यादी अखाद्य गवत काढण्यात आले व नियमित काढण्यात येत आहे.

७. गवतीकुरण विकसित करण्याकरिता स्थानिक गवती प्रजातीच्या बिया गोळा करून पावसाळयाच्या सुरवातीला त्याचे बीजारोपण करण्यात येते. या खाद्य प्रजातीमध्ये मारवेल, घोण्याड,नोशान, बेर,कुसळ, छोटा शिक्का,वैद्य इत्यादी प्रजाती आहेत.

८. मानव-प्राणी संघर्ष टाळण्यासाठी गवतीकुरण महत्वाची भूमिका निभावते. वन्यप्राण्यांना उत्तम अधिवास प्राप्त झाल्यामुळे वन्यप्राणी येथेच राहणे पसंत करतात आणि यामुळे वाघ व बिबट या वन्य प्राण्यांच्या अधिवास क्षेत्रामध्ये राहतात.

९. ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या बफर क्षेत्रातील वनात सुद्धा वन्यजीवांचा अधिवास उत्तम व्हावा, मानव-प्राणी संघर्ष टाळावा य करिता अखाद्य वनस्प्तीचे निर्मुलन करून स्थानिक गवती प्रजातीचे बियाणाचे बीजारोपण करण्यात आले आहे.

| गवती-कुरण व्यवस्थापण | हेक्टर |
|---|---|
| १. गवतीकुरण विकास | 731 हेक्टर |
| २. ताडोबा-अंधारी प्रकल्पाच्या कोअर मोहर्ली, कारवा, ताडोबा उपक्षेत्र पिपर-हेटी मधील अखाद्य वनस्पती चे समूळ निर्मुलन करण्यात आले. | १८९२.३ हेक्टर |
| १. बफर अखाद्य वनस्पतीचे उच्चाटन | |



## अधिवास व्यवस्थापन प्रक्रिया





## अखाद्य वनस्पती निर्मुलन






## स्थानिक गवती प्रजातीचे बियाणे गोळा करून साठवणूक





## बीजारोपण तयारी व लागवड





# ६. संशोधन



स्वयंमचलित कॅमेरामध्ये -चांदी अस्वल

संशोधन हे वने, वन्यजीव व्यवस्थापनातील अत्यंत महत्वाचा घटक आहे. संशोधनातून अचूक माहिती प्राप्त होते आणि या माहितीमधून वर्तमान व भविष्यासाठी मुलभूत असलेल्या बाबी अमलात आणता येतात व संरक्षण व संवर्धनातील उपाय-योजना, आखणी व बांधणी करता येते. संशोधनाचे विविध पैलू आहे आणि दुर्मिळ वन्यजीवांचा अधिवासाची सखोल माहिती होणे हा सुद्धा एक आहे, यामध्ये विशेषत: निशाचर प्राणी, उंदीर प्रजातीतील प्राणी इत्यादीची ही माहिती प्राप्त होते. ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प व भारतीय वन्यजीव संस्थान, देहरादून यांच्या माध्यमातून सुरु असलेल्या वन्यजीव संशोधन अभ्यासाच्या निकषा-नुसार वर्ष २०२३ मध्ये ८७ वाघ या व्याघ्र प्रकल्पाच्या बफर, कोअर क्षेत्रामध्ये असे प्रत्यक्ष अहवालानुसार प्रकशित करण्यात आले. ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प क्षेत्रामध्ये एप्रिल २०२२ ते मार्च २०२३ या कालावधीत विविध स्वरूपातील संशोधनात्मक उपक्रम सुरु आहेत. यामध्ये ताडोबा-अंधारी व्याघ्र संवर्धन प्रतिष्ठान सहकार्य करते.

1. Long-term monitoring of Tiger, Co-predators, and prey species in Tadoba-Andhari Tiger Reserve and adjoining Landscape with Wildlife Institute of India

2. Spatial & Temporal food preferences of different carnivores and herbivores in Tadoba-Andhari Tiger Reserve with National Centre for Biological Science (NCBS) Bangalore.

3. Maintain, improve grassland ecology within Critical Tiger Habitat, consultation with expert Dr. Gajanan D Muratkar.

4. Documentation of Bird Diversity of Tadoba-Andhari Tiger Reserve with Central India Bird Academy,Nagpur (CIBA)

## संशोधन





Long-term monitoring of Tiger, Co-predators, and prey species





Spatial,Temporal food preferences of different carnivores,herbivores



अधिवास व्यवस्थापन – गौर

## ७. शाश्वत निसर्ग पर्यटन

ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पातील स्थानिक लोकांना शाश्वत रोजगार उपलब्ध व्हावा व वनावरील निर्भरता कमी व्हावी, वन्यजीव संवर्धन व संरक्षणकरिता सहभाग दर्शवावा या अनुषंगाने विविध रोजगार निर्मित करण्यात येते जसे **जंगल सफारी, बोटिंग, पैदल निसर्ग भ्रमण, मचाणावरून पक्षीनिरीक्षण,मुक्काम, साहसी खेळ, सायकल ट्रेल, निसर्ग शैक्षणिक संकुल, होम स्टे (५०), वाईल्ड कॉल (मिमिक्री शो)**. एकूण १०००+ स्थानिक लोकांना रोजगार प्राप्त होतो तर त्यांच्यावर अवलंबून ५०००+ कुटुंबातील सदस्यांना प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष फायदा होतो, यामध्ये निसर्ग मार्गदर्शक, जिप्सी चालक, महिला बचत गट, पर्यटक व्यवस्थापक व मदतनीस, इतर कामगार इ. आहेत. सफारी उपक्रमामध्ये एकूण २२ पर्यटन गेट, ६ कोर व १६ हे बफर अंतर्गत आहे आणि  विविध वन परिक्षेत्रात असून ३५० निसर्ग मार्गदर्शक आहे. यातील २५ महिला निसर्ग मार्गदर्शक आहे तर ३५० जिप्सी मालक/चालक आहे. यामुळे युवकांना रोजगार उपलब्ध होत आहे.




| अक्र. | निसर्ग पर्यटन | संख्या | अर्थीक तपशील (प्रती दिवस) | प्रती महिना |
|---|---|---|---|---|
| १ | जंगल सफारी मार्गदर्शक | ३६० | रु. ५००/४५०/४०० (प्र सफारी ) | रु.१२००० ते १५००० |
| २ | जिप्सी चालक | ३५० | रु. ३००/३५० | रु.७०००/- |
| ३ | जंगल सफारी निसर्ग मार्गदर्शक | ३६० | रु. ५००/४५०/४०० (प्र सफारी ) | रु.१२००० ते १५००० |
| ४ | जिप्सी चालक | ३५० | रु. ३००/३५० | रु.७०००/- |
| ५ | जंगल सफारी निसर्ग मार्गदर्शक | ३६० | रु. ५००/४५०/४०० (प्र सफारी ) | रु.१२००० ते १५००० |
| ६ | जिप्सी चालक | ३५० | रु. ३००/३५० | रु.७०००/- |
| ७ | जंगल सफारी निसर्ग मार्गदर्शक | ३६० | रु. ५००/४५०/४०० (प्र सफारी ) | रु.१२००० ते १५००० |
| ८ | जिप्सी चालक | ३५० | रु. ३००/३५० | रु.७०००/- |
| ९ | जिप्सी चालक | ३५० | रु. ३००/३५० | रु.७०००/- |
| १० | जंगल सफारी निसर्ग मार्गदर्शक | ३६० | रु. ५००/४५०/४०० (प्र सफारी ) | रु.१२००० ते १५००० |
| ११ | जिप्सी चालक | ३५० | रु. ३००/३५० | रु.७०००/- |
| १२ | जंगल सफारी निसर्ग मार्गदर्शक | ३६० | रु. ५००/४५०/४०० (प्र सफारी ) | रु.१२००० ते १५००० |
| १३ | जिप्सी चालक | ३५० | रु. ३००/३५० | रु.७०००/- |
| १४ | जंगल सफारी निसर्ग मार्गदर्शक | ३६० | रु. ५००/४५०/४०० (प्र सफारी ) | रु.१२००० ते १५००० |
| १५ | जिप्सी चालक | ३५० | रु. ३००/३५० | रु.७०००/- |



बोटिंग



सायकल ट्रेल



नेचर ट्रेल



जंगल सफारी



निसर्ग शिक्षण संकुल



होम स्टे



साहसी खेळ



वाईल्ड कॉल मिमिक्री शो



## ८. कौशल्य विकास उपक्रमामार्फत रोजगार निर्मिती



ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प संवर्धन प्रतिष्ठानमार्फत ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प क्षेत्राच्या गावातील स्थानिक समुदायाकरिता व विशेषत: युवक-युवतींकरिता कौशल्य विकास उपक्रमा अंतर्गत रोजगारभिमुख प्रशिक्षण देण्यात येते. या मागील उद्देश असा की स्थानिकांची वनावरील निर्भरता कमी व्हावी, त्यांना या माध्यमातून उपजीविकेचे पर्यायी साधन उपलब्ध व्हावे आणि त्यांचा शाश्वत विकास व्हावा हा महत्वाचा उद्देश. या उद्देशाच्या हेतूने विविध रोजगारक्षम उपक्रम ताडोबा-अंधारी व्याघ्र संवर्धन प्रतिष्ठानच्या वतीने नियमित राबविण्यात येतात. कौशल्य विकास प्रशिक्षणाच्या माध्यमातून केवळ रोजगार प्राप्त होणार नसून स्थानिक पातळीवरील अनेक विषयांवर त्याच्या सकारात्मक परिणाम होईल ज्यामध्ये मानव-प्राणी संघर्ष कमी होईल, स्थानिक युवक वने व वन्यजीव संवर्धन व संरक्षणाच्या विविध उपक्रमांमध्ये सहभागी होतील, वन विभागाला स्थानिक पातळीवर सहकार्य निर्माण होईल.

• एप्रिल २०२२ ते मार्च २०२३ या कालावधीत स्थानिक १५ युवकांना Life Saving Techniques या उपक्रमा अंतर्गत पोहण्याचे व बोटिंग चालकाचे प्रशिक्षण देण्यात आले.
• ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पामार्फत उभारण्यात आलेल्या **वन्यजीवन कौशल्य विकास केंद्र, पांगडी** येथे ICICI प्रतिष्ठानच्या संपूर्ण सहकार्याने वन क्षेत्रातील ४९८ युवक-युवतींना सोलर व LED तंत्रज्ञ दुरूस्तीचे प्रशिक्षण देण्यात आले आहे.
• २८ स्थानिक महिलांना आदरतिथ्य व्यवस्थापनाचे प्रशिक्षण ICICI प्रतिष्ठान व मिटकॉन यांच्या माध्यमातून देण्यात आले आहे.
• कोलारा परिक्षेत्रातील सातारा गावातील स्थानिक महिलांना रोजगाराचे साधन उपलब्ध व्हावे या करिता कागदापासून हस्तकला केंद्र उभारले आहे.



स्थानिक वन क्षेत्रातील युवक-युवती-वन्यजीवन प्रशिक्षण केंद्र पांगडी






वन्यजीवन कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्र, पांगडी





आदरातिथ्य प्रशिक्षण



## हस्तनिर्मित कागद प्रकल्प, कागदापासून कलाकृती (स्थानिक महिलांच्या उन्नत विकासासाठी)

ताडोबा-अंधारी व्याघ्र संवर्धन प्रतिष्ठान व पिरामल ट्रस्ट तसेच वन्यजीव संवर्धन संस्था यांच्या सहकार्याने खंडसंगी परिक्षेत्रातील सातारा गावामध्ये स्थानिक गावातील महिलांना रोजगार प्राप्त व्हावा या हेतून हस्तनिर्मित कागद प्रकल्प उभारण्यात आला आहे आणि यामध्ये १० ते १५ महिला सहभागी आहे. या प्रकल्पामार्फत ते कागदापासून हस्तकला निर्मित करतील आणि या माध्यमातून त्यांना रोजगार रोजगार उपलब्ध होणार आहे.






स्थानिक महिला बचत गट

## ९. जनजागृती व निसर्ग शिक्षण उपक्रम
## शालेय विद्यार्थ्यांकरिता निसर्ग शिबीर व जंगल भ्रमंती

जन -जागृती हा निसर्ग शिक्षणातील पाया असून व्याघ्र प्रकल्प क्षेत्रातील विद्यार्थी हे या उपक्रमातील महत्वाचा अंग व निसर्ग संरक्षण दूत आहे. या विद्यार्थ्यांना वने व वन्यजीवांविषयी गोडी निर्माण करण्यासाठी विविध उपक्रमांच्या माध्यमातून निसर्ग शिक्षणाचे धडे देण्यात येतात. ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पामार्फत बफर क्षेत्रातील सर्व शाळेमध्ये सदर उपक्रम नियमित राबविण्यात येतात आणि यामध्ये शाळा व विद्यार्थी मनापासून सहभागी होतात. ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प व बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी, मुंबई या जगविख्यात व संशोधन व पर्यावरण शिक्षण क्षेत्रात कार्यरत असलेल्या संस्थेसोबत चंद्रपूर जिल्ह्यातील शासकीय,अनुदानित तसेच आश्रम शाळेच्या विद्यार्थ्यांकरिता निसर्ग शिबीर उपक्रम निशुल्करित्या राबविण्याचे कार्य करत आहे.

ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प कार्यालयालामार्फत चंद्रपूर जिल्ह्यातील सर्व शाळेतील विद्यार्थ्यांना **"चला माझ्या ताडोबाला"** या उपक्रमा अंतर्गत निशुल्क वन भ्रमंती उपक्रम राबविण्यात येत आहे आणि सर्व विद्यार्थ्यांना कोर क्षेत्रामध्ये शासकीय पर्यावरण शिक्षण वाहनाने वनभ्रमंतीला घेऊन जाण्यात येते. या उपक्रमामध्ये प्रथम ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पामार्फत बफर क्षेत्रातील विद्यार्थ्यांसाठी निर्माण करण्यात आलेल्या निसर्ग शिक्षण संकुल मदनापूर व आगरझरी या गावामध्ये विद्यार्थ्यांना शासकीय पर्यावरण शिक्षण वाहनाने प्रथम घेऊन येतात आल्यावर त्यांना निसर्ग शिक्षण संदर्भातील माहिती पट, सादरीकरण दाखविण्यात येते तसेच संवादाच्या माध्यामातून ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाचे महत्व, मानव प्राणी संघर्ष कसा टाळावा, जंगल का वाचवावे या विषयी गंमत-जमंत पद्धतीने समजावून सांगण्यात येते. **जानेवारी २०२२ ते एप्रिल २०२३ या कालावधीत एकूण१३२ शाळेतील ४४५६ विद्यार्थी व ३९१ शिक्षकांनी यामध्ये सहभाग दर्शविला आहे.**

हे उपक्रम घेण्यामागील उद्देश असा कि, सहभागी होणारे सर्व विद्यार्थी ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प परिसरातील व जिल्ह्यातील असून त्यांच्या मनात निसर्गाविषयी आदर निर्माण व्हावा, वने व वन्यजीव संवर्धन व संरक्षण क्षेत्रात त्यांनी सहभागी व्हावे आणि स्थानिक व वनविभाग यांच्यामधील दुवा व्हावे जेणेकरून स्थानिक गावकरी व वनविभाग यांच्यातील सहसंबंध उत्तम राहतील. या शिवाय या ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प व बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीच्या माध्यमातून या व्याघ्र प्रकल्प क्षेत्रातील व वाघाच्या भ्रमण मार्गातील ५० शाळेमध्ये नियमिती पर्यावरण जन-जागृतीचे उपक्रम नियमित राबविण्यात येतात आणि या करींत Axis Bank मार्फत निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.

**जानेवारी २०२२ ते एप्रिल २०२३उपक्रम तपशील एकूण सहभागी शाळा – 132**

| महिना | शाळा व कार्यक्रम | विद्यार्थी संख्या | शिक्षक संख्या |
|---|---|---|---|
| फेब्रुवारी ते मार्च 22 | आदिवासी विकास विभाग शाळा | 1301 | 131 |
| एप्रिल 22 | जिल्हा परिषद शाळा | 411 | 32 |
| एप्रिल 2022 | शिक्षकांकरिता निसर्ग शिबीर | | 37 |
| सप्टेंबर 2022 | पर्यावरण दूत निसर्ग शिबीर | 50 | 25 |
| डिसेंबर 22 ते फेब्रुवारी 23 | निसर्ग शिबीर व वन भ्रमंती | 2104 | 136 |
| मार्च 2023 | आदिवासी विकास विभाग शाळा | 500 | 24 |
| मार्च 2023 | सैनिक शाळा | 90 | 06 |
| | **एकूण** | **4456** | **391** |



## निसर्ग शिक्षणातून वने व वन्यजीव संवर्धन व संरक्षण













| | फेब्र ते मार्च २२ | एप्रिल २२ | एप्रिल २२ | सप्टेंबर २२ | डिसें. २२ फेब्र.२३ | मार्च २३ | मार्च २३ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| विद्यार्थी संख्या | १३०१ | ४११ | | ५० | २१०४ | ५९० | |
| शिक्षक संख्या | १३१ | ३२ | ३७ | २५ | १३६ | ३० | |



## महिला जाणीव जागृती शिबीर

ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पामार्फत तसेच बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीच्या माध्यमातून महिलांचे जाणीव-जागृती शिबीर आयोजित करण्यात येते. वन क्षेत्रातील महिलांचा सहभाग वने व वन्यजीव संवर्धन व संरक्षणामध्ये व्हावा हा या मागील महत्वाचा हेतू. यामध्ये ताडोबा वनाचे स्थानिकांसाठी महत्व, मानव प्राणी संघर्ष कसा टाळावा, रोजगार क्षेत्रात महिलांचा सहभाग निर्माण करणे इत्यादी विषय घेण्यात येतात.

महिला व वनाचा खूप जवळचा संबंध आहे कारण वनातील वनउपज गोळा करायला मोठ्या प्रमाणात महिला जातात आणि यामध्ये अनेकदा मानव-प्राणी संघर्ष घडतो आणि हे टाळण्यासाठी महिला जाणीव जागृती उपक्रमांच्या माध्यमातून त्यांना याविषयी समजावून सांगण्यात येते.

**२० गावातील ५१० महिलांनी** यामध्ये सहभाग घेतलेला आहे तसेच ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प प्रतिष्ठान मार्फत सुद्धा महिला जाणीव जागृती उपक्रम घेण्यात येत आहे. यामध्ये मोहर्ली व भामडेळी गावातील १७० महिलांनी सहभाग घेतला आहे.



महिला जाणीव जागृती शिबीर

# महिला जाणीव जागृती शिबीर











स्थानिक महिलांकरिता महिला जाणीव-जागृती उपक्रम



# गुराखी जाणीव जागृती शिबीर

ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प क्षेत्रामध्ये ९५ गावे आहेत आणि गावातील जनावंरांना चारण्यासाठी गुराखी वनाच्या व शेताच्या दिशेने घेऊन जातात आणि अनेकदा या भागामध्ये वाघाचा किवा बिबट्याचा वावर असल्यास पाळीव प्राण्यांवर हल्ला होण्याची शक्यता असते तसेच अकात्स्मितरित्या मानव-प्राणी संघर्ष घडतो म्हणून गुराखी जाणीव जागृती शिबीर घेण्यात येत आणि त्यांना सदर विषया संदर्भातील गंभीरता या उपक्रमाच्या माध्यमातून सविस्तरपणे समजावून सांगण्यात येते.
ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प संवर्धन प्रतिष्ठान व बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी यांच्या संयुक्त विद्यामाने बफर क्षेत्रातील गुराखी जाणीव जागृती उपक्रम राबविण्यात आले आहे आणि या उपक्रमाला ४५० गुराखी उपस्थित होते. या उपक्रमांमध्ये त्यांना मानव प्राणी संघर्ष टाळता यावा करिता मास्क सुद्धा वाटप करण्यात आले होते.



मानव-प्राणी संघर्ष टाळण्यासाठी मास्क वाटप





गुराखी-जाणीव जागृती कार्यशाळा

## १०. मानव-प्राणी संघर्ष व उपाय योजना

मानव प्राणी संघर्षाचे विविध स्वरूप आहे यामध्ये मुख्यत शेती व जंगल परिसरात अकाल्स्मितरित्या वन्यजीवांचा हल्ल्या होणे, शेतामध्ये तृणभक्षी प्राणी येऊन शेतीचे नुकसान करणे आणि शेतीचे नुकसान होऊ नये म्हणून इलेक्ट्रिक करंट सोडणे आणि यामध्ये वन्यजीव मरणे किवा प्राणी उघड्या विहरीमध्ये पडणे, रात्री किवा अगदी पहाटे वन्यप्राणी गावामध्ये येणे आणि यामध्ये अपघाताने घटना घडतात आणि या घटनांना मानव-प्राणी संघर्ष म्हणतात. ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प क्षेत्रात आकस्मित घडणाऱ्या अशा मानव-प्राणी संघर्षाला आळा घालण्यासाठी विविध पातळीवर उपाय-योजना आखण्यात येतात व अमलबजावणी करण्यात येते आणि यामध्ये ताडोबा-व्याघ्र प्रकल्प संवर्धन प्रतिष्ठान महत्वाची भूमिका पार पाडते. यामध्ये विशेषतः शेतीसाठी सौर कुंपण, गाव परिसारत सौर दिवे, विहिरीला कठडे, पाळीव जनावराकरिता पक्के गोठे व पाण्याची व्यवस्था करणे, जनजागृती उपक्रम घेण्यात येतात, पर्यायी रोजगार निर्मिती, एल.पी.जी. वाटप, नाला व तलावा खोलीकरण तर अत्याधुनिक तंत्रांचा वापर करून विविध पातळीवर मानव प्राणी संघर्ष टाळण्यासाठी उपक्रम राबिण्यात येतात.



LPG वाटप



सोलर पथदिवे





मानव प्राणी संघर्ष टाळण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर





पक्के तारेचे कुंपण





शेती संरक्षणासाठी सौर कुंपण



## प्राथमिक कृती दल

मानव प्राणी संघर्ष हा कळीचा व नाजूक विषय आहे. या विषयाला सर्वसमावेशक पद्धतीचा वापर करून कमी करणे हे महत्वाचे ध्येय आहे. यामध्ये स्थानिक पातळीवर निर्मित करण्यात आलेल्या प्राथमिक कृती दलाची भूमिका ही अत्यंत महत्वाची. अशा या कृती दलामध्ये गावाविषयी आस्था असणे व वने व वन्यजीवांविषयी आदर व आवड असलेले युवक सहभागी होतात.



- स्थानिक समुदयाला सोबत घेऊन दल तयार करण्यात आले आहे. मानव-प्राणी संघर्ष टाळण्यासाठी हे भरीव कार्य करतात.
- ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प बफर क्षेत्रातील गावांमध्ये **प्राथमिक कृती** दलामध्ये स्थानिक युवकांचा समावेश आहे जे स्वयम इच्छेने यामध्ये सहभागी झाले आहे.
- या युवकांना मानव-प्राणी संघर्ष कसा हाताळावा यांचे अशासकीय संस्थाच्या सहकार्याने प्रशिक्षण देण्यात आले आहे.
- **या व्याघ्र प्रकल्पामध्ये ४० प्राथमिक कृती दल असून एकूण २०० स्थानिक समुदयातील युवक कार्यरत आहे.**
- गाव परिसरातील जंगलात नियमिती गस्त करतात, वाघ, बिबट व अस्वल इत्यादी प्राण्यांच्या हालचालीवर लक्ष्य देतात आणि वन कर्मचारी, अधिकारी व गावकऱ्यांना सावध करतात, पाळीव प्राण्याची शिकार झाली तर त्या क्षेत्रात गस्त काटेकोरपणे करतात आणि कॅमेरा ट्रॉप लावून माहिती गोळा करतात.
- गाव परिसारत वाघ, बिबट शिरल्यास स्थानिक समुदयाची गर्दी नियत्रित करतात , हाका करत वन्यप्राण्याला वनाचा दिशेने हाकलावून देतात, जन-जागृती उपक्रम राबविणे अशा विविध संदर्भातील कामे प्राथमिक कृती दल करतात.
- **या करिता ताडोबा-अंधारी व्याघ्र संवर्धन प्रतिष्ठानमार्फत मासिक मानधन देण्यात येते व इन्शुरन्स काढले आहे.**
- **या प्राथमिक कृती दलांनी १००+ लोकांना जीवित हानी पासून वाचविले आहे व शेकडो गुरांना सुद्धा.**
- या कृती दलांना सुरक्षीतेच्या अनुषंगाने सर्व साहित्य पुरवण्यात आले आहे.



गाव वनामध्ये गस्त करतांना PRT



स्थानिक जन-जागृती



वणवा नियत्रण



वन जमीन अतिक्रमण निर्मुलन



## शीघ्रकृती दल

**ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या अंतर्गत कार्य करणारी शीघ्र कृती दल ही एक मानव-प्राणी संघर्ष टाळण्यासाठी निर्मित करण्यात आलेली विशेष, प्रशिक्षित विभाग आहे. मानव-प्राणी संघर्ष टाळण्याचे अत्यंत जोखमीचे व महत्वाचे काम शीघ्र कृती दलामार्फत होते. ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प संवर्धन प्रतिष्ठान या करिता सर्वतोपरी सहकार्य करते.**


वाढत चाललेला मानव-प्राणी संघर्ष पाहता वर्ष २०१३ मध्ये चंद्रपूर जिल्ह्यामध्ये शीघ्र कृती दलाची निर्मित करण्यात आली. या दलामध्ये एक प्रशिक्षित पशु वैद्यकीय अधिकारी (डॉक्टर), एक पोलीस नाईक (शुटर), क्षेत्रीय वन कर्मचारी यांच्या सहभाग होता. या दलाचे काम २४/७ दक्ष राहणे होते व आहे, जिथे कुठे वाघ, बिबट, अस्वल किवा इतर वन्यजीव गावामध्ये शिरला, हल्ला झाला किवा इतर अनुचित घटना घडण्यापूर्वी यांना पकडून सुरक्षित अधिवासात मुक्त करणे किवा यांच्या हल्ल्यात मनुष्य हानी झाली असेल तर त्या प्राण्याला वरिष्ठांच्या आदेशानुसार गोरेवाडा प्राणी संग्रालयामध्ये हस्तांतरीत करणे हे अत्यंत महत्वाचे व जिकरीचे कार्य या दलामार्फत होत होते. **या मानव प्राणी संघर्षाची तीव्रता लक्षात घेता २०१७-१८ ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पामध्ये महाराष्ट्र शासन यांच्या सुचनेनुसार शीघ्र कृती दलाची म्हणजेच बचाव कृती दलाची निर्मिती करण्यात आली आणि या दलामध्ये अनुभवी व तज्ञ डॉक्टर (डॉ.रवीकिरण खोब्रागडे) पोलीस नाईक श्री. अजय मराठे (शुटर), विशेष व्याघ्र दलातील ६ सदस्य (वनरक्षक) या सर्वांना केंद्रीय व राज्यस्तरीय स्थरावरील विविध संस्थामार्फत उत्तम प्रशिक्षण देऊन एक सक्षम व प्रभावी शीघ्र कृती दल तयार करण्यात आला.**

- मानव-प्राणी संघर्ष टाळण्यासाठी शीघ्र कृती दलाचे मोठे योगदान आहे.
- गाव परिसरात वन्यप्राणी शिरला तर त्यांना बेशुद्ध करून परत त्यांच्या अधिवासात सोडण्यात येते.
- **कृती दलाने २०१४-१५ ते २०२२-२३ कालावधीत ५७ वाघ, ४६ बिबट, ३१ अस्वले स्थानिक परिसरातून सुरक्षित पकडले.**
- दलामध्ये प्रतिष्ठानमार्फत पशु वैद्यकीय, सहायक व वाहन चालक याशिवाय ४ वनरक्षक यामध्ये पूर्ण वेळ कार्यरत आहेत.
- या शीघ्र कृतीदला लागणारे सर्व साहित्य, वाहन, मेडिसीन हे ताडोबा-अंधारी व्याघ्र संवर्धन प्रतिष्ठानमार्फत पुरविण्यात येते.


बचाव पथक वाहन


बचाव पथक वाहन


शीघ्र कृती दल (RRT)






## ११. ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प वर्धापन दिवस

दिनांक २३ फेब्रुवारी १९९५ ला ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प हे भारतातील १९वे तर महाराष्ट्रातील दुसरे व्याघ्र प्रकल्प म्हणून घोषित करण्यात आले होते आणि याच अनुषंगाने दिनांक २३ फेब्रुवारी २०२३ ला चंद्रपूर येथील प्रियदर्शनी इंदिरा गांधी सभागृहामध्ये लोक-सहभागातून २८ वा वर्धापन दिवस यशस्वीरित्या साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून माननीय श्री. सुधीर मूनगंटीवार मंत्री, वने, मत्स्य व्यवसाय आणि सास्कृतिक कार्य, महाराष्ट्र राज्य व पालकमंत्री, चंद्रपूर-गोंदिया जिल्हा हे होते तर प्रमुख उपस्थितीत माननीय श्री. सुरेश धानोरकर, खासदार, चंद्रपूर, वणी आणि आर्णी लोकसभा क्षेत्र, माननीय श्री. किशोर जोरगेवार, आमदार चंद्रपूर विधानसभा क्षेत्र, मा. श्री. चंदनसिंग चंदेल माजी अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य वन-विकास मंडळ, मा. श्री.एम.एस. रेड्डी, अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, वन-प्रबोधनी, चंद्रपूर, मा. श्री. प्रकाश लोणकर मुख्य वनसंरक्षक, चंद्रपूर वृत्त, चंद्रपूर, मा.श्री.विनय गोंडा जी.सी. (भा.प्र.से.) जिल्हा-अधिकारी, चंद्रपूर, मा.श्री. विवेक जॉनसन (भा.प्र.से.) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,चंद्रपूर मा. श्री. रविंद्रसिह परदेशी (भा.पो.से.) पोलीस अधीक्षक,चंद्रपूर तसेच महाराष्ट्र वन विभागातील वन-अधिकारी, ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प क्षेत्रात पूर्वी कार्यरत असलेले वन-अधिकारी, ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या बफर क्षेत्रातील गावकरी, ९५ ग्राम-परीस्थीतीकीय विकास समितीचे सदस्य, प्राथमिक कृती दलाचे सदस्य, निसर्ग मार्गदर्शक व जिप्सी चालक, ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या बफर क्षेत्रातील शालेय विद्यार्थी, शिक्षक, अशासकीय संस्थेचे प्रतिनिधी, कॉर्पोरेट क्षेत्रातील प्रतिनिधी आणि पत्रकार अशा ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या विकासासाठी कार्यरत सर्व क्षेत्रातील १००० पेक्षा अधिक लोक या कार्यक्रमाच्या उद्देशाने उपस्थित होते.





लोक सहभाग-२८ वा वर्धापन दिवस, ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प

## ग्राम-परिस्थितीकीय विकास समितींना धनादेश वाटप

डॉ.श्यामा प्रसाद मुखर्जी जन-वन-योजने अंतर्गत ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या कोर व बफर क्षेत्रामध्ये असलेल्या गावामध्ये ग्राम परीस्थीतीकिय समिती निर्माण करण्यात आलेल्या होत्या आणि या मागील असा उद्देश होता कि लोक संहभागातून गावाचा तसेच वने व वन्यजीवांचा शाश्वत विकास करणे जेणेकरून समतोल राखला जाईल व मानव प्राणी संघर्ष टाळणे आणि याच अनुषंगाने या व्याघ्र प्रकल्पाच्या क्षेत्रात असलेल्या ९५ ग्राम परीस्थीतीकिय विकास समितींना मा. श्री. सुधीर मूनगंटीवार मंत्री, वने, मत्स्य व्यवसाय आणि सास्कृतिक कार्य, महाराष्ट्र राज्य व पालकमंत्री, चंद्रपूर-गोंदिया जिल्हा, माननीय श्री. किशोर जोरगेवार, आमदार चंद्रपूर विधानसभा क्षेत्र व इतर मान्यवरांच्या हस्ते या वनाचे भागीदार म्हणून **प्रती ग्राम परिस्थितीकीय विकास सामितींना ३.५० लाख धनादेश प्रदान करण्यात आलेत.** हा महसूल निसर्ग पर्यटन क्षेत्रातून प्राप्त झाला असून गावाच्या मुलभूत सुविधा पूर्ण करण्यासाठी आहे.





ग्राम परिस्थितीकिय विकास समितींना धनादेश वितरण



## उत्कृष्ट ग्राम परिस्थितीकिय विकास समितींना पुरस्कार प्रधान

वने, वन्यजीव व गावाच्या विकासासाठी उत्कृष्ट कार्य करत असणाऱ्या पाच ग्राम परिस्थितीकिय विकास समितींना रुपये २५ हजारांचा धनादेश व सन्मान चिह्न देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. **यामध्ये मामला, अलीझंजा, आगरझरी, करवण, वासेरा या ग्राम परिस्थितीकिय विकास समितींचा समावेश आहे.**











## उत्कृष्ट प्राथमिक कृती दल पुरस्कार

ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प क्षेत्रातील मानव-प्राणी संघर्ष टाळण्यासाठी वन विभाग आणि स्थानिक यांच्यातील महत्वाचा दुवा म्हणून प्राथमिक कृती दल कार्यरत आहे. या प्रकल्प क्षेत्रात ४० प्राथमिक कृती दल असून यामध्ये २०० स्थानिक व स्वयं इच्छेने प्रेरित तरुण सभासद आहेत. या सर्व प्राथमिक कृती दलांचा विमा सुद्धा काढण्यात आला आहे आणि त्यांना मासिक मानधन सुद्धा ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पामार्फत देण्यात येते. या कृतीदलापैकी पाच प्राथमिक कृती दलांना उत्कृष्ट प्राथमिक कृती दल पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. **यामध्ये पडझरी, चक निंबाळा, सितारामपेठ, कुकडहेटी व वडाळा** यांचा समावेश आहे.

प्राथमिक कृती दल,
पडझरी



प्राथमिक कृती दल,
निंबाळा



प्राथमिक कृती दल,
वडाळा



प्राथमिक कृती दल,
कुक्कडहेटी



प्राथमिक कृती दल,
सीतारामपेठ





## ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प क्षेत्रातील वर्ग १० वी व १२ वीच्या गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार व सन्मान

सामाजिक जाणीव म्हणून ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प क्षेत्रालगत राहणाऱ्या गावातील वर्ग १०वी व 12वी मधील ३५ गुणवंत विद्यार्थ्यांना त्यांच्या शिक्षणासाठी उपयुक्त असलेले टॅबलेट व लॅपटाप भेटू देऊन कौतुक व सन्मान करण्यात आले.
या वना शेजारी राहणारे विद्यार्थी हे मुख्यत: शेतकरी, मोल-मजुरी तसेच कामगार या कुटंबातील आहे आणि अतिशय प्रतिकूल परिस्थितीत राहून सुद्धा त्यांनी यश संपादीत केले आहे हे विशेष: आणि म्हणूनच या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला आणि या माध्यमातून त्यांच्या व गावातील लोकांमध्ये वने, वन्यजीव व वन विभागाविषयी आदराची भावना निर्माण होईल या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला आहे.

**बफर गावातील 10 वी बोर्ड परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची यादी**

| अ. क्र. | वनपरिक्षेत्र | गावाचे नाव | विद्यार्थ्यांची नावे | वर्ग | शैक्षणिक सत्र | टक्केवारी | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | चंद्रपूर (बफर) | चेकनिंबाळा | श्वेता सुभाष ताजने | 10 वी | 2021-22 | 91.40% | बफर विभाग |
| 2 | चंद्रपूर (बफर) | वरवट | रश्मी संजय दुर्योधन | 10 वी | 2021-22 | 85.20% | ---"--- |
| 3 | पळसगाव (बफर) | मासळ | तनुजा अंकोश गंधारे | 10 वी | 2021-22 | 85.40% | ---"--- |
| 4 | मुल (बफर) | मारोडा | यश विश्वनाथ भूपतवार | 10 वी | 2021-22 | 89.40% | ---"--- |
| 5 | मुल (बफर) | मारोडा | आदित्य विनोद मानकर | 10 वी | 2021-22 | 88.20% | ---"--- |
| 6 | मुल (बफर) | उश्राळा | रेश्मा हरीचंद्र कोरडे | 10 वी | 2021-22 | 87.40% | ---"--- |
| 7 | मुल (बफर) | मारोडा | अनुश्री नंदकिशोर बटकमवार | 10 वी | 2021-22 | 85.40% | ---"--- |
| 8 | मुल (बफर) | भादुर्णी | समीर हरिदास गेडाम | 10 वी | 2021-22 | 85.20% | ---"--- |
| 9 | मोहर्ली (बफर) | मोहर्ली | संस्कृती अरविंद मगरे | 10 वी | 2021-22 | 87.00% | ---"--- |
| 10 | शिवणी (बफर) | जामसाळा | सुमित गजानन श्रिरामे | 10 वी | 2021-22 | 91.80% | ---"--- |
| 11 | शिवणी (बफर) | कळमगावं गन्ना | प्रणोती गौतम गेडाम | 10 वी | 2021-22 | 91.20% | ---"--- |
| 12 | शिवणी (बफर) | वासेरा | आचल राजू गोबाडे | 10 वी | 2021-22 | 89.80% | ---"--- |
| 13 | शिवणी (बफर) | कळमगावं गन्ना | समीक्षा तुळशीराम कस्तुरे | 10 वी | 2021-22 | 89.40% | ---"--- |
| 14 | शिवणी (बफर) | कळमगावं गन्ना | सुचीता खुशाल नन्नावरे | 10 वी | 2021-22 | 89.20% | ---"--- |
| 15 | शिवणी (बफर) | वासेरा | जागेश खेमराज बोरकर | 10 वी | 2021-22 | 89.20% | ---"--- |
| 16 | शिवणी (बफर) | वासेरा | प्रिया रतन तोंडफोडे | 10 वी | 2021-22 | 89.00% | ---"--- |
| 17 | शिवणी (बफर) | कळमगावं गन्ना | स्मिता बाळकृष्ण गेडाम | 10 वी | 2021-22 | 88.20% | ---"--- |
| 18 | शिवणी (बफर) | वासेरा | प्रज्वल घनशाम मडीवार | 10 वी | 2021-22 | 86.80% | ---"--- |
| 19 | शिवणी (बफर) | जामसाळा | सुमित तंतपाल नागदेवते | 10 वी | 2021-22 | 86.60% | ---"--- |
| 20 | शिवणी (बफर) | वासेरा | चांदणी वासुदेव उईके | 10 वी | 2021-22 | 86.20% | ---"--- |
| 21 | शिवणी (बफर) | वासेरा | ओमकार मारोती पुस्तोडे | 10 वी | 2021-22 | 86.20% | ---"--- |
| 22 | शिवणी (बफर) | पेठगाव | दीक्षा ज्ञानेश्वर गभणे | 10 वी | 2021-22 | 86.00% | ---"--- |
| 23 | शिवणी (बफर) | वासेरा | गणेश प्रकाश बोरकर | 10 वी | 2021-22 | 86.00% | ---"--- |
| 24 | शिवणी (बफर) | नलेश्वर | प्रणय खट्टू चांदेकर | 10 वी | 2021-22 | 85.60% | ---"--- |
| 25 | शिवणी (बफर) | वासेरा | अजय विलास मेश्राम | 10 वी | 2021-22 | 85.60% | ---"--- |
| 26 | शिवणी (बफर) | वासेरा | धनश्री एकनाथ बोरकर | 10 वी | 2021-22 | 85.40% | ---"--- |
| 27 | शिवणी (बफर) | मोहाळी | वसुंधरा विनोद बगडे | 10 वी | 2021-22 | 85.20% | ---"--- |
| 28 | शिवणी (बफर) | शिवणी | मयुरी कैलाश गहाणे | 10 वी | 2021-22 | 85.00% | ---"--- |
| 29 | ताडोबा (कोर) | अर्जूनी | संस्कृती प्रभाकर बोधे | 10 वी | 2021-22 | 85.80% | कोर विभाग |
| 30 | ताडोबा (कोर) | अर्जूनी | श्वेता सोमेश्वर क्षीरसागर | 10 वी | 2021-22 | 85.60% | कोर विभाग |
| 31 | ताडोबा (कोर) | अर्जूनी | आचल सोपान धारणे | 10 वी | 2021-22 | 85.60% | कोर विभाग |
| 32 | ताडोबा (कोर) | अर्जूनी | साक्षी विलास जुम्बाडे | 10 वी | 2021-22 | 85.60% | कोर विभाग |

## वर्ग १० वीतील ३२ गुणवंत विद्यार्थ्यांना टॅबलेट देऊन गौरव








## वर्ग 12 वीच्या ३ विद्यार्थ्यांना लॅपटाप देऊन सन्मानित करण्यात आले

| अक्र. | परिक्षेत्र | गाव | विद्यार्थ्यांचे नाव | शैक्षणिक संत्र | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | शिवणी | जामसाळा | भाग्यश्री नामदेव ढोणे | २०२१-२२ | ७८% |
| २ | | नलेश्वर | तृप्ती सुरेश चांदेकर | २०२१-२२ | ७७.८३ % |
| ३ | शिवणी | जामसाळा | मिलेश रविदास गेडाम | २०२१-२२ | ७५.५० % |





# शिष्यवृत्ती प्राप्त २६ शालेय मुलींना सायकल भेट देऊन गौरविण्यात आले

ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प क्षेत्रातील व वनाशेजारी राहणाऱ्या गावामधील रोज ६ ते ८ किलोमीटर पैदल शाळेत जाणे-येणे करणाऱ्या गरजू व शिष्यवृत्ती प्राप्त २६ मुलीनां सायकल भेट देऊन गौरविण्यात आले आणि त्यांची पुढील शैक्षणिक वाटचाल सोपी करण्यात आली. सदर गावे ही वना शेजारी आहे आणि शाळेच्या मार्ग हा बफर क्षेत्राच्या वनातून जातो आणि यामुळे पैदल जातांना कधी वन्यजीव दिसतात, जसे शाळा सकाळी असतांना किवा संध्याकाळी शाळेतून परत येतांना यामुळे या विद्यार्थ्यांना सायकल भेट देण्यात आली आहे.

| अक्र. | नाव | वर्ग | गाव |
|---|---|---|---|
| १ | प्रतीक्षा अरविंद पेगडपल्लीवार | ५ वा | घोसरी |
| २ | मोनिका पन्नू नागोसे | ५ वा | घोसरी |
| ३ | गौरी अनिल रंदये | ५ वा | घोसरी |
| ४ | चंदा माधव लाखे | ५ वा | घोसरी |
| ५ | नव्या जगदीश तुमराम | ५ वा | घोसरी |
| ६ | समृद्धी संतोष कामडी | ६ वा | घोसरी |
| ७ | समीक्षा नामदेव मेश्राम | ६ वा | घोसरी |
| ८ | प्रणाली प्रशांत लाखे | ७ वा | घोसरी |
| ९ | मयुरी माधव लाखे | ७ वा | घोसरी |
| १० | अक्षरा पद्माकर कुमरे | ६ वा | खुटवंडा |
| ११ | श्रावणी अशोक कुंभरे | ६ वा | खुटवंडा |
| १२ | आशा विकास पैदाम | ६ वा | खुटवंडा |
| १३ | गायत्री संतोष कन्नाके | ७ वा | खुटवंडा |
| १४ | सयाणी संतोष कन्नाके | ७ वा | खुटवंडा |
| १५ | समीक्षा विकास पैदाम | ७ वा | खुटवंडा |
| १६ | रुपाली विजय बावणे | ७ वा | खुटवंडा |
| १७ | कशिश संजय धारणे | ९ वा | खुटवंडा |
| १८ | एकता रमेश बावणे | ९ वा | खुटवंडा |
| १९ | संजीविनी संतोष कन्नाके | १० वा | खुटवंडा |
| २० | ममता विष्णुदास पैदाम | १० वा | खुटवंडा |
| २१ | निहाल सुभाष जांभुळे | ५ वा | कुकडहेटी |
| २२ | यश तुळशीराम कारमेंगे | ५ वा | कुकडहेटी |
| २३ | सोनाली गजानन बोरकर | ५ वा | कुकडहेटी |
| २४ | श्रेया संजय श्रीरामे | ५ वा | कुकडहेटी |
| २५ | वैष्णवी धनराज दडमल | ५ वा | आष्टा |
| २६ | अनुष्का विकास श्रीरामे | ८ वा | विलोडा |



प्राथमिक कृती दल पडझरी



# उत्कृष्ट निसर्ग मार्गदर्शक पुरस्कार

ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पामध्ये निसर्ग पर्यटनासाठी कार्यरत पाच उत्कृष्ट निसर्ग मार्गदर्शकांना गौरविण्यात आले. यामध्ये जैवविविधतेबद्दल असलेले ज्ञान, पर्यटकांसोबतची वागणूक व संवाद, वन-विभागाला सहकार्य अशा विविध निकषांच्या आधाराद्वारे त्यांची निवड करण्यात आली.

| अक्र. | नाव | पर्यटन गेट |
|---|---|---|
| १ | वसंत शंकर सोनुले | मोहर्ली (कोर) |
| २ | मंगेश पाडुरंग नन्नावरे | कोलार (कोर) |
| ३ | रामराव सखाराम नेहारे | नवेगाव (कोर) |
| ४ | अरविंद चौखे | अलीझंजा (बफर) |
| ५ | भिवा मेश्राम | जुनोना (बफर) |



श्री.वसंत शंकर सोनुले



श्री.मंगेश पाडुरंग नन्नवरे



श्री. भीवा मेश्राम



श्री. अरवींद चौखे



श्री. रामराव नेहारे

## उत्कृष्ट होम-स्टे पुरस्कार

ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प क्षेत्रांमध्ये असलेल्या ४५ होम स्टेपैकी उत्कृष्ट २ होम स्टेची निवड उत्कृष्ट होम-स्टे पुरस्काराकरिता करण्यात आली. यामध्ये मोहर्ली येथील लेक व्ह्यू व वाघाई होम स्टे आहे. विविध पर्यावरण पूरक निकषांच्या आधारावर या होम-स्टे ची निवड करण्यात आली आहे.



लेक व्ह्यू होम स्टे



वाघाई होम स्टे

## ग्रीन रिसॉर्ट अवार्ड

ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प क्षेत्रात ५० पेक्षा अधिक रिसॉर्ट असून यापैकी पर्यावरण पूरक अशा विविध निकषांच्या आधारावर वाघोबा-लॉज पगदंडी रिसोर्ट ची निवड ग्रीन रिसॉर्ट अवार्ड करिता करण्यात आली.





## सामाजिक बांधिलकी सन्मान

सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या व ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प क्षेत्रात वने व वन्यजीव संवर्धन, संरक्षण व स्थानीक गावाच्या विकासासाठी विविध अंगाणी सहकार्य करणाऱ्या २० कॉर्पोरेट संस्था, अशासकीय संस्था यांच्या सन्मान ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या २८ व्या वर्धापन दिनानिमित्त करण्यात आला आहे.

| अक्र. | सामाजिक संस्था | सामाजीक दायित्व कार्य |
|---|---|---|
| १ | ICICI FOUNDATION FOR INCLUSIVE GROWTH | या संस्थेने ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाला ११ गस्ती वाहने, सोलर पॉवर यंत्रणा तर स्थानिक युवकांच्या शाश्वत रोजगाराकरिता पांगडी येथील वन्यजीवन कौशल्य विकास प्रशिक्षण केद्र, वन्यजीवासाठी कुरण विकास उपक्रम अशा विविध क्षेत्रात महत्वपूर्ण योगदान दिले आहे. |
| २ | AXIS FOUNDATION | ताडोबा अंधारी क्षेत्रातील ५० शाळेच्या निसर्ग शिक्षण उपक्रमाकरिता मोलाचे योगदान दिले. |
| ३ | DP WORLD | २ गस्ती वाहने व ड्रोन देऊन सहकार्य केले आहे. |
| ४ | ICERTIS | १ गस्ती वाहन संरक्षणाकरिता दिले |
| ५ | SBI FOUNDATION | बफर क्षेत्रातील प्रवेशद्वारावर CCTV व माहिती-दर्शक फलक लावण्याकरिता सहकार्य करणे. |
| ६ | MITCON Solution for Sustainable Tomorrow | वन्यजीवन कौशल्य विकास केद्र, पांगडी संचलित करतात व तसेच अग्नीरक्षक उपकरणे देवून सहकार्य केले |
| ७ | WILD LIFE CONSERVATION TRUST | वाघाचा मागोवा घेणे, क्षेत्रीय वन कर्मचारी यांच्याकरिता अत्यंत गरजेचे साहित्य वेळोवेळी पाठविणे, क्षमता विकास प्रशिक्षण देणे त्यांची आरोग्य तपासणी उपक्रम राबवितात. |
| ८ | HEMENDRA KOTHARI FOUNDATION | वन कर्मचारी यांच्या करिता कल्याणकारी निधी देणे, विशेषता; दैनिक वेतनावर काम करणाऱ्या कर्मचारी गावकरी याच्यांकरिता. |
| ९ | TIGER REASERCH AND CONSERVATION TRUST | ही संस्था मानव प्राणी संघर्ष कमी करण्यासाठी उपक्रम राबवितात, स्थानिक वन परिसरातील गावामध्ये प्राथमिक कृती दल तयार करतात, ज्यामध्ये प्रशीक्षण देणे, साहित्य देणे इत्यादी. |
| १० | FOREST DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA | STPF करिता गस्ती वाहने व वनपरिक्षेत्र अधिकारी यांच्या करिता उपलब्ध करून दिली आहे |
| ११ | WATER IS LIFE SOCIETY | दहा वर्षापासून ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प क्षेत्रात सोलर पंप, पाण्याची व्यवस्था करत आहे. |
| १२ | TATA PROJECT LTD, MUMBAI | कोलारा व मोहर्ली पर्यटन गेटवर पाण्याचे फिल्टर देऊन योगदान दिले आहे |
| १३ | MAHINDRA HOLIDAYS & RESORT INDIA LTD | २ सोलर पॉवर युनिट देऊन आपले योगदान दिले आहे |
| १४ | HDFC CAPITAL ADVISIROS LTD | ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प क्षेत्रातील गावकऱ्यांचे ई श्रमिक कार्ड उपलब्ध करून दिले |
| १५ | WILDLIFE TRUST OF INDIA | क्षेत्रीय वन कर्मचारी यांना पाठबळ देण्यासाठी महत्वपूर्ण सहकार्य केले आहे |
| १६ | WORLDWIDE FUND FOR NATURE-INDIA | क्षेत्रीय वन कर्मचारी यांना पाठबळ देण्यासाठी महत्वपूर्ण सहकार्य केले |
| १७ | ECO-PRO, CHADRAPUR | ही संस्था वन्य प्राणी बचाव, तसेच प्राथमिक कृती दल निर्मित करणे त्यांचे प्रशिक्षण देणे व क्षमता विकास करणे, कोर क्षेत्रातील पुनर्वसणासाठी महत्वपूर्ण सहकार्य केले आहे आणि वन्यजीव संवर्धन व संरक्षणासाठी नेहमी तत्पर असतात. |
| १८ | BOMBAY NATURAL HISTORY SOCIETY | ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प क्षेत्रातील शाळेमध्ये नियमित पर्यावरण शिक्षण जन जागृतीचे उपक्रम राबवितात, मानव प्राणी संघर्ष टाळावा या करिता नियमित गावकऱ्यांचे प्रशिक्षण घेतात. |
| १९ | SATPUDA FOUNDATION | ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प क्षेत्रातील गावामध्ये वैद्यकीय तपासणी व सुविधा नियमित पुरव-तात आणि तसेच निसर्ग शिक्षण क्षेत्रात कार्य करतात. |
| २० | Vivek Goynaka and Zita Goynal | यांनी बचाव कृती दलकरिता सहकाऱ्य केले आहे . |

# सामाजिक बांधिलकी सन्मान


ICICI Foundation for Inclusive Growth


Wildlife Conservation Trust


ICERTIS


MITCON


Axis Foundation


SBI Foundation


Eco-Pro Organization




Tiger Research & Conservation Trust


Vivek Goenka & Zita Goenka


Worldwide Fund for Nature India


Wildlife Trust of India


Water Is Life Society


Forest Development Corporation


Satpuda Foundation


Bombay Natural History Society

## संवेदना व जाणीव

ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पातील निमढेला येथे पर्यटन गेटचे व्यवस्थापक स्व. जितेंद्र नन्नावरे यांचे हृदय विकाराने आकस्मिक निधन झाले होते म्हणून त्यांच्या पत्नी श्रीमती मंगला जितेंद्र नन्नावरे यांना रुपये १ लाखाची आर्थिक मदत ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पामार्फत करण्यात आली.




श्रीमती मंगला जितेंद्र नन्नावरे

## प्रकाशन व माहिती पट

ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प संवर्धन प्रतिष्ठानमार्फत वने व वन्यजीव तसेच जैवविविधता संदर्भातील पुस्तक व माहिती पट निर्मित करण्यात येतात. यामध्ये प्रत्येक महिन्याला प्रकशित "ताडोबा डायरी" व विशेष वार्षिक अंक प्रकाशित करण्यात आला आहे. ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या जैवविविधता संदर्भातील "Enchanting Tadoba" हे कॉफी टेबल बुक प्रकशित करण्यात आले आहे. या शिवाय ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पावर आधारित माहितीपट निर्मित करण्यात आला आहे.


### प्रकाशन साहित्य


१. Enchanting Tadoba Coffee Table Book
२. ताडोबा डायरी
३. जंगलातल्या गोष्टी (निसर्ग मार्गदर्शक)
४. प्रमुख गवत प्रजाती

### माहिती पट

१. ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प माहिती पट
२. ताडोबा माहिती पट










प्रकाशित माहितीपट

## १२. वन अधिकारी व कर्मचारी क्षमता विकास

ताडोबा-अंधारी व्याघ्र संवर्धन प्रतिष्ठानमार्फत वन अधिकारी, क्षेत्रीय व कार्यालयीन कर्मचारी यांच्याकरिता क्षमता-विकास उपक्रम राबविण्यात येतात. यामध्ये पुरस्कार, प्रशिक्षण, क्षेत्रीय भेट, इत्यादी उपक्रम राबविण्यात आले आहेत.

### उत्कृष्ट सेवा पुरस्कार

वने, वन्यजीव संवर्धन,संरक्षण सदर्भात क्षेत्रीय,कार्यालयीन स्तरावरील उत्कृष्ट कार्य केले आहे अशा व्यक्तींना ताडोबा-अंधारी प्रकल्पा मार्फत गौरविण्यात येते आणि याकरिता ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प संवर्धन प्रतिष्ठान मोलाची भूमिका पार पाडते.





प्रजासत्ताक दिनानिमित्त (२६ जाने.) उत्कृष्ट वनसेवा पुरस्कार वितरण





### क्षमताविकास प्रशिक्षण

ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प संवर्धन प्रतिष्ठानमार्फत वनअधिकारी,कर्मचारी यांच्याकरिता संवर्धन,संरक्षण,अत्याधुनिक तंत्र-ज्ञान, व्यवस्थापन तसेच व्यक्तिमत्व विकास संदर्भातील प्रशिक्षण आयोजित करण्यात येतात. या प्रशिक्षणामुळे विविध विषयाचे स्वरूप कळते, कामाची मांडणी, तंत्रांचा वापर इ. गोष्टी समजतात, या सर्व बाबींचा उपयोग प्रत्यक्ष काम करतांना महत्वाचा ठरतो.



कुरणविकास व्यवस्थापन प्रशिक्षण







क्षेत्रीय वनकर्मचारी यांच्याकरिता कुरणविकस प्रात्यक्षिक उपक्रम





ड्रोन हाताळणी प्रशिक्षण





जैवविविधता मापन कार्यशाळा

## १३. वने व वन्यजीव विषयक दिवस

ताडोबा-अंधारी व्याघ्र संवर्धन प्रतिष्ठानमार्फत वने वन्यजीव संदर्भातील उपक्रम शालेय विद्यार्थी, वनाधिकारी व कर्मचारी यांच्या सहभागातून राबविण्यात येतात. या उपक्रमामागील हेतू असा आहे कि, समाजातील सर्व घटकांपर्यत निसर्ग संवर्धनाचा संदेश पोहचावा तसेच त्यांनी आपआपल्या परीने निसर्ग संवर्धन व संरक्षणामध्ये सहभाग घ्यावा. **यासोबतच सामाजिक बांधिलकी जपणारा जागतिक महिला दिवस सुद्धा साजरा करण्यात आला आहे.**

| अक्र. | दिवस | उपक्रम |
|---|---|---|
| १ | जागतिक व्याघ्र दिन<br>२९ जुलै २०२२ | अशासकीय संस्थेच्या सहकार्याने ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या बफर क्षेत्रातील शाळेमध्ये विविध उपक्रम राबविण्यात आले आहेत. वन अकादमी चंद्रपूर येथे राष्ट्रीय स्तरीय व्याघ्र प्रकल्प दिवस साजरा करण्यात आला आहे. |
| २ | चित्ता जनजगृती उपक्रम<br>१७ सप्टेंबर | या व्याघ्र प्रकल्प क्षेत्रातील शाळामध्ये चित्ता जनजागृती अभियान राबविण्यात आले होते. यामध्ये माहितीपट, सादरीकरण, इत्यादी उपक्रम सादर केले आहेत. |
| ३ | वन्यजीव सप्ताह -१ ऑक्टो ते ७ ऑक्टो २०२२ | या व्याघ्र प्रकल्प परिसरातील शाळांमध्ये वने व वन्यजीव संवर्धन व संरक्षण संदर्भातील जनजागृती उपक्रम घेण्यात आले आहेत. यामध्ये वन्यजीवनावर आधारित माहिती पट, सादरीकरण, निसर्ग भ्रमंती इत्यादी निसर्ग मार्गदर्शकांमार्फत स्थानिक गावामध्ये जनजागृती उपक्रम घेण्यात आले |

### जागतिक व्याघ्र दिन
### २९ जुलै २०२२




वाघ संवर्धन -चित्रकला स्पर्धा




वन्यजीव सप्ताह उपक्रम २०२३



## १४. इतर महत्वपूर्ण उपक्रम

### घन कचरा व्यवस्थापन

ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प संवर्धन प्रतिष्ठानमार्फत व Know How,पुणे या अशासकीय संस्थेच्या सहकार्याने ताडोबा अंधारी क्षेत्रातील पर्यटन गेट जवळील गावांमध्ये तसेच या क्षेत्राच्या परीसरामधील रिसोर्ट, होम स्टे, उपहार गृह, इतर दुकानांमधील घनकचरा व्यवस्थापन करण्याचे कार्य राबविण्यात येत आहे.

विशेषतः मोहर्ली व आगरझरी या पर्यटकांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असलेल्या परिसरातील ४०+ रिसोर्ट होम स्टे, उपहार गृह व इतर लहान मोठ्या दुकानातून घनकचरा संकलित करून प्रथम जैविक व सुका कचरा वेगळा करण्यात येतो. जैविक कचरा केंद्रामध्ये जैविक खत निर्मिती करण्यात येते तर सुका व विषेशतः प्लास्टिक कचरा हा चंद्रपूर येथे विघटन व पुनर्प्रक्रियेकरिता नियमित पाठविण्यात येतो. तसेच धोकादायक कचरा सुद्धा संकलित करण्यात येतो. जैविक खताचा वापर हा विविध संदर्भातील कामाकरिता वापरण्यात येत आहे. ज्यामध्ये फुलपाखरू उद्यानामध्ये जैवविविधता जपण्यासाठी या खताचा वापर करण्यात येतो व स्थानिक गावकारी सुद्धा शेती, परसबागेत या खताचा वापर करतात.

या उपक्रमामुळे या वन क्षेत्रालगतचा भाग परिपूर्णपणे विविध अंगानी होणाऱ्या प्रदुषणातून मुक्त होत आहे. यामध्ये पाणी, माती, रसायन, हवेच्या अशा विविध प्रदूषणातून मुक्त होण्याच्या दिशेने कार्य सुरु आहे. या उपक्रमाची सुरवात मोहर्ली या पर्यटन क्षेत्रातील महत्वपूर्ण गावातून २०२२-२३ मध्ये झाली तर आता आगरझारी व भामडेळी या गांवाचाही समावेश यामध्ये करण्यात आला आहे आणि याकामाकरिता पूर्ण वेळ दोन प्रशिक्षित Eco-coach नियुक्ती Know How यांच्यामार्फत करण्यात आली तर या संस्थेला आर्थिक पाठबळ ताडोबा-अंधारी व्याघ्र संवर्धन प्रतिष्ठान करते. जैविक खत निर्मिती केद्रामध्ये स्थानिक महिलांना रोजगार सुद्धा उपलब्ध झाला आहे. स्थानिक सुद्धा स्वयंम इच्छेने प्रेरित होऊन गाव स्वछता अभियान, प्लास्टिक मुक्त गाव विविध उपक्रम राबवितात. या उपक्रमांच्या माध्यमातून वने हे प्लास्टिकमुक्त, प्रदूषण मुक्त होत आहे. **वन्यजीव व पाळीव प्राण्यांना यामुळे होणारे अपाय सुद्धा पूर्णपणे कमी होण्याच्या दिशेने कार्य होत आहे.**






## प्लास्टिक मुक्त ताडोबा

**वर्ष २०२१-२२ या कालावाधातील एकूण ४३१३२ ग्लास बॉटल पर्यटकांनी खरेदी केल्या आहेत तर ऑक्टोबर २०२२ ते मे २०२३ पर्यत एकूण ४३०० ग्लास बॉटल बॉटल पर्यटकांनी खरेदी केल्या आहेत. ८००० पर्यटकांनी वापर केला.**

ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प व झेवा या अशासकीय कंपनीसोबत ताडोबा प्लास्टिक मुक्त अभियानाला सुरूवात वर्ष ५ नोव्हेंबर २०२१ मध्ये सुरु करण्यात आलेली होती. प्रथम या संस्थेच्या सहकार्याने मोहर्ली येथे स्थापन करण्यात आले होते आणि उत्तम प्रतीच्या काचेच्या  ग्लास बॉटलमध्ये शुद्धीकरण व निर्जंतुक पाणी पर्यटकांकरिता उपलब्ध करून देण्यात आले. यामध्ये पर्यटकांनी प्लास्टिक बॉटल वनभ्रमंती मध्ये सोबत न नेता या ग्लास बॉटलचा वापर करावा हा उद्देश. यामध्ये पर्यटक बॉटल खरेदी करू शकतात किवा केवळ पाण्याची किमतीचे शुल्क त्यांनी द्यावे. जेणेकरून ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प हे प्लास्टिक मुक्त वन राहील यांनी वने व वन्यजीवांना या प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष फायदा होईल तसेच पर्यटन क्षेत्रातील गावामध्ये होणारे प्लास्टिकचे प्रदूषण कमीत कमी होईल आणि या सोबतच पर्यटकामध्ये पर्यावरण संवर्धन व संरक्षणाचा संदेश जाईल.







## वन वाचनालय

ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प संवर्धन प्रतिष्ठान-मार्फत निसर्ग मार्गदर्शक वाचनाची गोडी निर्माण व्हावी, ज्ञानात भर व्हावी व निसर्गातील घटकांचा अभ्यास व्हावा या हेतून कोअर क्षेत्रातील पर्यटन गेटला वन वाचनालय सुरु करण्यात आले आहे. यामध्ये प्राणी, पक्षी, कीटक, वनस्पती, निसर्ग, ललित निसर्ग पुस्तके तसेच व्यक्तिमत्व विकास संदर्भातील विविध पुस्तके आहेत.







## इंटर्नशिप कार्यक्रम

ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प संवर्धन प्रतिष्ठान मार्फत वन्यजीव संशोधन,सामाजिक संशोधन,घनकचरा व्यवस्थापन,निसर्ग पर्यटन अशा विविध उपक्रमांकरिता या क्षेत्रातील शिक्षण प्राप्त संशोधक,पदव्युत्तर विद्यार्थी यांना एक महिन्याच्या इंटर्नशिप उपक्रमा अंतर्गत नियुक्ती करण्यात येते आणि या इंटर्नमार्फत संशोधन,विविध सर्वेक्षण व उपक्रम राबविण्यात येतात आणि सदर इंटर्नशिप कार्यक्रम पूर्ण झाल्यानंतर त्यांना प्रमाण-पत्र देऊन सन्मानित करण्यात येते. या उपक्रमाचा उद्देश असा आहे कि, या विद्यार्थ्यांनी व संशोधकांनी वन्यजीव संवर्धन, सामाजिक हेतूच्या माध्यामातून वने व वन्यजीवांचे संवर्धन करण्यासाठी पुढाकार घ्यावा, विविध विषय समजून घ्यावे, इतर विद्यार्थ्यांना व संशोधकांना सुद्धा या क्षेत्रात कार्य करण्यासाठी प्रेरीत करावे हा हेतू असून विविध संशोधनात्मक व सामाजिक उपक्रम त्यांच्यामार्फत राबविण्यातून व्याघ्र प्रकल्पाला सहकार्य होईल या या महत्वपूर्ण उद्देशाने इंटर्नशिप कार्यक्रम राबविण्यात येतो. वर्ष २०२२ मध्ये एकूण ७ इंटर्न नियुक्त करण्यात आले होते यामध्ये घनकचरा व्यवस्थापन, सामाजिक संशोधन, सोशल मिडीया, रोजगार निर्मिती इत्यादी विषयामध्ये त्यांनी उत्तम कार्य केले आहे.





# १५. ताडोबा-अंधारी व्याघ्र संवर्धन प्रतिष्ठानमध्ये कार्यरत महत्वाची पदे

| **अक्र.** | **पद** | **संख्या** | **जबाबदारी** |
|---|---|---|---|
| १ | पशु वैद्यकीय डॉक्टर | 2 | वन्यप्राण्यांमुळे मानवी जीवतहानी झाली असेल किवा गाव परिसरामध्ये वन्यप्राणी शिरला असेल तर त्यांना पकडण्याची जबाबदारी असते. टीटीसी केंद्रामध्ये ठेवण्यात आलेल्या वन्य प्राण्यांची तपासणी व देखभाल करणे. |
| २ | पशु वैद्यकीय पर्यवेक्षक | १ | TTC केंद्रांची देखभाल पाहणे. |
| | सिविल इंजीनियर | 3 | व्याघ्र प्रकल्प क्षेत्रात सुरु असलेल्या बाधकांमाच्या बाबीचे काम बघण्यासाठी. |
| 3 | वकील | 1 | कायदेविषयक कामांकरिता नेमण्यात आले आहे. |
| 4 | वन्यजीव अभ्यासक | 1 | वन्यजीवांचा सखोल अभ्यास व संशोधन करण्यासाठी |
| | पर्यावरण शिक्षण तज्ञ व उपजीविका तज्ञ | 1 | स्थानिक समुदायासोबत पर्यावरण शिक्षणाचे उपक्रम राबविणे स्थानिक समुदायातील लोकांसाठी रोजगाराच्या पर्यायी संधी उपलब्ध करून देणे. |
| ५ | जीआयएस तज्ञ | 2 | या व्याघ्र प्रकल्पाचे जीआयस प्रणालीद्वारे मॅपिंग करणे. |
| ८ | पर्यटक व्यवस्थापक | 32 | पर्यटन गेटवरील व्यवस्थापन योग्यरित्या राबविण्यासाठी. |
| 9 | पर्यटन गेट मदतनीस | 13 | पर्यटन गेटवरील देखभालकरिता. |
| | | **55** | |